महाराष्ट्र शासन
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, जि.सांगली.
Government Medical College, Miraj Dist-Sangli

Tel:0233/2232090-99 Fax:2231959 E-mail:-deangmcmiraj@yahoo.co.in

जा.क्र./शावैममि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/लेखी परिक्षा/६०५३ /२०२६ दिनांकः-२८.०७.२०२६

## प्रसिध्दीपत्रक

व्ही.आर.डी.एल (VRDL) सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथील मल्टी टास्किंग स्टाफ भरण्याबाबत उमेदवारांकडून ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविले होते. अर्ज मागविणे करीता जाहिरात क्रमांकः जा.क्र.शावैममि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/जाहिरात/५७१३/२०२६ दि.१०.०७.२०२६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांकडून ऑफलाईन स्वरुपात अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच लेखी परिक्षेबाबात जा.क्र.शावैममि/व्ही.आर.डी.एल/कंत्राटीपदे/लेखी परीक्षा/५९८३/२०२६ दि.२३.०७.२०२६ अन्वये प्रसिध्दपत्रक जाहिर केले होते. जाहिरातीत नमुद केल्यानुसार जाहिरातीमधील अटी व शर्ती क्र. १० नुसार लेखी परीक्षा घेण्यात येईल असे कळविले होते. लेखी परिक्षा दि. ०१.०९.२०२६ रोजी शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे घेण्यात येईल. लेखी परीक्षा मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, गणित बुध्दिमता या विषयावर घेण्यात येईल. तसेच लेखी परीक्षेस येताना अर्ज केलेल्या कागदपत्राची पोहच व आधार/पॅन कार्ड (मूळ प्रत) सोबत आणावे. सदर बाबतीत व्ही.आर.डी.एल कार्यालयास वारंवार येवून अथवा संपर्क साधून परीक्षेबद्दल विचारणा करण्यात येवू नये. तसेच संस्थेचे संकेतस्थळ नियमित पाहत रहावे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. लेखी परीक्षेचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

### परीक्षेचे स्वरुप व त्या अनुषांगिक सुचना :-

परीक्षा दिनांक :- ०१.०९.२०२६ परीक्षेची वेळः- दु. ३ ते ४ परीक्षा कालावधी :- १ तास

रिपोर्टिंग वेळ :- दु. २ वाजता

परीक्षेचे ठिकाण :- व्याख्यान गृह शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

| अ.क्र. | पदाचे नांव | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बौध्दिक चाचणी किंवा अंकगणित | | एकूण गुण * | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मल्टी टास्किंग स्टाफ | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| | | १० | २० | १० | २० | १५ | ३० | १५ | ३० | ५० | १०० |

* टिपः- चूकीच्या पर्याया करीता २५% गुण वजा केले जातील.

- परीक्षा ही ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येईल परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
- पर्याय निवडताना फक्त (काळा बॉलपेनचा) वापर करावा.

डॉ. प्रकाश गुरव
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज

Scanned with OKEN Scanner